ePaper

**एकनाथ शिंदे-देवेंद्र फडणवीस दिल्ली दौऱ्यावर, मंत्रिमंडळ विस्तारावर चर्चा होण्याची शक्यता**



| वर्ष - 6 | अंक - 108 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत

- 10 दिवसांत 'मुठे'तून वाहिले साडेतीन टीएमसी पाणी
- महापालिका अधिकारी, कर्मचाऱ्यांना 'ड्रेसकोड'!
- रुग्णांना झोळीत बांधून, वाहती नदी पार करून रुग्णालयात दाखल

www.mahaenews.com | ।। शनिवार ।दिनांक 23 जुलै 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



"महिला म्हणून राजकारणात काम करताना आपली जबाबदारी वाढते. आपण अधिक संवेदनशीलपणे वागलं पाहिजे. नाना पटोले यांनी चित्रा वाघ यांच्याविरोधात भारतीय दंडविधानाप्रमाणे गुन्हा दाखल करावा. कुणालाही कुणाच्या व्यक्तिगत आयुष्यातील व्हिडीओ टाकण्याचे अधिकार नाहीत. लग्न झालेलं जोडपे हनिमुनला गेले तर ते हातात हात घातल्याचे, जवळ उभे असल्याचे फोटो टाकतात. थेट हनिमुन होतानाचे व्हिडीओ टाकत नाही हे चित्रा वाघ यांनी लक्षात घ्यावं."

**-रुपाली पाटील,** राष्ट्रवादी नेत्या

शिवसेना पक्ष एकसंघ व्हावा असा प्रयत्न केला. पण त्याच्यातून काही साध्य झालं नाही. शिवसेना टिकवण्यासाठी बाळासाहेबांचे हिंदुत्व, त्यांचे विचार टिकवण्यासाठी भाजपा-सेना युती गरजेची होती. महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी आणि काँग्रेसमुळे शिवसेना पक्षाचं अतोनात नुकसान झालं. शिवसेना अभियानांतर्गत राज्यभर आम्हाला दौरे करायला लावले. तेव्हा पदाधिकारी,कार्यकर्त्यांचा रोष राष्ट्वादीवर असल्याचं समजलं. म्हणून शिंदे गटात सहभागी झालो.

**-श्रीरंग बारणे,** खासदार मावळ लोकसभा मतदार संघ



# शिवसेना वाचविण्यासाठी घेतला निर्णय!

## ठाकरेंशी चर्चा करूनच घेतला निर्णय, बंडखोर खासदार -श्रीरंग बारणेंचा दावा

**पिंपरी ।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटात गेल्यानंतर खासदार बारणे हे पहिल्यांदाच मतदारसंघात आले. यावेळी त्यांच्यावर फुलांची उधळण विमानतळावर करण्यात आली. शिवसेना उपजिल्हाप्रमुख बाळासाहेब वाल्हेकर, पिंपरी विधानसभा प्रमुख राजेश वाबळे, रोहित माळी, राजेंद्र तरस, कष्टक-यांचे नेते बाबा कांबळे यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक, कार्यकर्ते, समर्थक यावेळी उपस्थित होते. "कोण आला रे कोण आला, शिवसेनेचा वाघ



आला", "मावळ का नेता कैसा हो श्रीरंग आप्पा जैसा हो", "आप्पा बारणे आगे बढो, हम तुम्हारे साथ है","आम्ही फक्त आप्पा भक्त", अशा घोषणा यावेळी त्यांनी दिल्या. माझा कोणताही घोटाळा नाही. त्यामुळे कुठल्याही यंत्रणेला घाबरत नाही. फक्त शिवसेना पक्ष वाचवा यासाठी आम्ही ही भूमिका घेतल्याचे बारणे यांनी यावेळी सांगितले."सध्याची राजकीय परिस्थिती पाहता भाजप-शिवसेनेची युती झाली पाहिजे. या मताशी लोकसभेतील 12 खासदार सहमत आहेत. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यासोबत झालेल्या बैठकीत आम्ही ही भूमिका मांडली. 2019 च्या निवडणुकीत मतदारांनी भाजप-शिवसेना युतीला कौल दिला होता. नंतरच्या कालावधीत महाविकास आघाडी झाली. परंतू, राज्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा शिवसेनेला संपवू पाहत आहे. त्यादृष्टीकोनातून मुख्यमंत्री शिंदे यांनी शिवसेनेबाबत घेतलेली भूमिका आणि उचललेले पाऊल याचे आम्ही समर्थन केले. बाळासाहेबांच्या विचाराची शिवसेना वाचविण्यासाठी आणि हिंदुत्वाचा विचार जागृत करण्याकरिता मुख्यमंत्री शिंदे यांनी उचललेल्या पावलाला शिवसैनिकांनी, नेत्यांनी समर्थन दिले आहे", असे ते म्हणाले.

### उद्धव ठाकरेंना मुख्यमंत्री व्हायचेच नव्हते, पण शरद पवारांनी...

**रोज उठून कोणाच्या घरावर दगड मारण्याची आवश्यकता नसते. ते आपल्या संस्कृतीला शोभत नाही, या शब्दांत त्यांनी शिवसेना नेते व खासदार संजय राऊत यांच्यावर शरसंधान केले. महाविकास आघाडी सरकारकडून कोणतेही सहकार्य मिळत नव्हते. राष्ट्रवादी सर्वाधिक निधीचा वापर करत होती, या शब्दांत त्यांनी शिवसेना सत्तेत असलेल्या राज्यातील अगोदरच्या सरकारवर तोफ डागली. जोपर्यंत युतीत सहभागी होतो, तोपर्यंत केंद्राकडून चांगले सहकार्य मिळत होते. महाविकास आघाडी झाल्यानंतर ते मिळणे बंद झाले, असे त्यांनी सांगितले.**

# आदिवासी शाळांना आमदार लांडगेंचा 'एक हात मदतीचा'

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाचे निमित्त

**। पिंपरी । महाईन्यूज ।**

राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त पुणे जिल्ह्यातील आदिवासी शाळांमध्ये शैक्षणिक आणि आवश्यक साहित्याची मदत करण्यासाठी भाजपा शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांनी पुढाकार घेतला आहे.



वाढदिवसानिमित्त राज्यातील भाजपा कार्यकर्ते, पदाधिकारी आणि हितचिंतकांनी अनावश्यक खर्च न करता सामाजिक व विधायक उपक्रमांचे आयोजन करावे. त्याद्वारे वाढदिवसाच्या शुभेच्छा द्याव्यात, असे आवाहन उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी केले होते. २०१५ पासून विधायक पद्धतीने वाढदिवस साजरा करण्याची भूमिका फडणवीस यांनी ठेवली आहे. त्या भूमिकेला अनुसरुन प्रत्येकवर्षी आमदार लांडगे सामाजिक उपक्रमांचे आयोजन करतात. यावर्षी देशाच्या राष्ट्रपतीपदी द्रौपदी मुर्मू यांची निवड झाली. त्यापार्श्वभूमीवर पुणे जिल्ह्यातील आदिवाशी शाळांमध्ये मदत देण्याचा संकल्प आमदार लांडगे यांनी केला आहे.दरम्यान, भाजपा शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खरोशी, ता. खेड, शिवाजी विद्यालय व कला व वाणिज्य महाविद्यालय, डेहणे, ता. खेड, शिवशंकर विद्यालय व चिंतामनराव मोरमारे कनिष्ठ विद्यालय, तळेघर, ता. आंबेगाव, श्री. पंढरीनाथ कला-वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मु.पो. पोखरी, ता. आंबेगाव, विश्व हिंदू परिषद वनवासी विद्यार्थी वसतीगृह, राजगुरूनगर, ता. खेड, कुंडेश्वर विद्यालय, पाईट, ता. खेड, सेवाग्राम ट्रस्ट माळेगाव, ता. मावळ, जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक शाळा, भरतवाडी, कल्याण आश्रम, पोखरी, ता. आंबेगाव, आदी शाळांमध्ये शैक्षणिक साहित्य आणि दैनंदिन वापराच्या वस्तू भेट स्वरुपात देण्यात येणार आहेत.आमदार लांडगे म्हणाले की, देशाच्या सर्वोच्च राष्ट्रपतीपदी श्रीमती द्रौपदी मुर्मू यांची बहुमताने निवड झाली. देशातील वंचित, शोषित आणि आर्थिक मागास समाजासाठी ही विशेष आनंदाची बाब आहे. तसेच, राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्याचे आवाहन राज्यातील कार्यकर्ते, पदाधिकारी आणि हितचिंतकांना केले होते. त्याला सकारात्मक प्रतिसाद देत आम्ही प्रतिवर्षी विधायक उपक्रम घेवून साजरा करीत असतो.

## शॉर्ट न्यूज »

### तब्बल तीन वर्षांपासून तुरुंगात असलेल्या डीएसकेंना जामीन



। पुणे । महाईन्यूज ।

सदनिका विकत घेतलेल्या नागरिकांकडून आगाऊ रक्कम घेऊन फ्लॅटचा ताबा दिला नाही म्हणून दाखल असलेल्या गुन्ह्यात बांधकाम व्यावसायिक दीपक सखाराम कुलकर्णी (डीएसके) यांना न्यायालयाने जामीन मंजूर केलेला आहे. सत्र न्यायाधीश एस.के. डुगावकर यांनी हा आदेश दिला. याबाबत सिंहगड पोलिस ठाण्यात मोफा कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.डीएसके आणि त्यांच्या पत्नी हेमंती कुलकर्णी यांनी फ्लॅट खरेदीदारांकडून आगाऊ रक्कम घेतली आणि फ्लॅटचा ताबा देण्यात अयशस्वी ठरल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला. ठेवीदारांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी दाखल असलेल्या मुख्य गुन्ह्यात डीएसके आणि इतर आरोपी १७ फेब्रुवारी २०१८ पासून तुरुंगात आहेत.

# 10 दिवसांत 'मुठे'तून वाहिले साडेतीन टीएमसी पाणी !

## पुणे धरणसाखळीत वर्षभर पुरेल इतका पाणीसाठा

। पुणे। महाईन्यूज ।

जुलै महिन्यात वरुणराजाने कृपा केल्याने पुणे धरणसाखळीत पुढील वर्षभर पुरेल इतका पाणीसाठा जमल्याचे पाटबंधारे विभागाची आकडेवारी सांगत आहे. जुलै महिन्याच्या पहिल्या २० दिवसांतच पुणे धरणसाखळीत तब्बल २२ टीएमसी पाणी जमा झाले. तर मुठा नदीतून साडेतीन टीएमसी पाणी भीमा खोऱ्यातून उजनी धरणाच्या दिशेने वाहिले. त्यामुळे पाऊस २० दिवस आणि पाणीसाठा २२ टीएमसी, अशी दिलासा देणारी आकडेवारी समोर आली आहे.



जुलै महिन्याच्या सुरवातीपासूनच हवामानाने रंग बदलले. अरबी समुद्रात केरळपासून गुजरातपर्यंत तीव्र क्षमतेचा कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला आणि सलग २० दिवस राज्यभरात पावसाने मुसळधार बॅटिंग केली. पुणे परिसरात तर सुमारे १५ दिवस संततधार पाऊस पडला. परिणामी खडकवासला, पानशेत, वरसगाव, टेमघर ही मुख्य धरणसाखळी आणि पिंपरी चिंचवड परिसरासाठी महत्त्वाचे पवना धरण आदींमध्ये अवघ्या २० दिवसांत जवळपास ६५ टक्के जलसाठा झाला आहे. जून महिन्यात पाऊसच न झाल्याने पुणे व परिसरात महानगरपालिकेने पाणीकपातही लागू केली होती. ती या मुसळधार पावसामुळे मागे घेण्यात आली. गेल्या दोन दिवसांपासून पावसाने विश्रांती घेतली असली तरी धरणांच्या पाणलोट क्षेत्रात, तसेच घाटमाथ्यावर अद्याप पाऊस सुरूच आहे. त्यामुळे या महिनाअखेरीस धरणांच्या साठ्यांत अजून भर पडण्याची शक्यता आहे.

### दहा दिवसांतच सोडावे लागले पाणी

पाटबंधारे विभागाच्या आकडेवारीनुसार जून महिन्यात धरणसाखळीत अवघा ८.८० टक्के पाणीसाठा होता. जुलै महिन्याच्या पहिल्या २० दिवसांनंतर तो ६८ टक्क्यांच्या आसपास आहे. २.५७ टीएमसीवरून जलसाठ्याने २२ टीएमसी इतकी झेप घेतली आहे. खडकवासला धरण छोट्या क्षमतेचे असल्याने ते कमी कालावधीत भरते. मात्र, धरणसाखळीतील धरणे एकापाठोपाठ एक असल्याने अन्य धरणांच्या पाणलोट क्षेत्रातूनही खडकवासलात पाण्याची आवक असते. त्यामुळे यंदा जुलै महिन्याच्या दहा दिवसांत खडकवासला धरणातून साडेतीन टीएमसी पाणी मुठा नदीपात्रात सोडावे लागले. सध्या पावसाने विश्रांती घेतल्याने मुठा नदीतील विसर्ग थांबवण्यात आल्याचे पाटबंधारे विभागाने कळवले आहे.

# मॉडर्न हायस्कूलची मुले सातवीपासूनच करतात एमपीएससी, यूपीएससीची तयारी

## चला महाराष्ट्र घडवू या चळवळीचे प्रणेते प्रा.शिवराज पाटील यांचे मोफत मार्गदर्शन

पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे मॉडर्न हायस्कूल (मुलांचे) शिवाजीनगर पुणे-5 या प्रशालेत स्पर्धा परीक्षा ही काळाची गरज ओळखून सातवी इयत्तेपासून स्पर्धा परीक्षांची सवय लावण्यास सुरुवात केली आहे. विद्यार्थ्यांना परीक्षेचे मार्गदर्शन वर्ग मोफत सुरू करण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांस चला महाराष्ट्र घडवू या चळवळीचे प्रणेते प्रा.शिवराज पाटील हे मोफत मार्गदर्शन करतात.



या उपक्रमाचे कौतुक संस्थेचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन एकबोटे,कार्यवाह शामकांत देशमुखसह कार्यवाह , मा.नगरसेविका प्रा.ज्योत्स्ना एकबोटे, शाळा समिती अध्यक्ष चित्तरंजन कांबळे, शाळेचे व्हिजिटर उद्धव खरे, नियामक मंडळ सदस्य प्रमोद शिंदे, दादाभाऊ शिनलकर यांनी केले.

या उपक्रमाचे आयोजन मुख्याध्यापिका रोहिणी काळे, उपमुख्याध्यापिका वंदना सोनोने पर्यवेक्षक निवृत्ती गोपाळे,या कार्यक्रमास सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नवेश पाटील,आभार खंडू खेडकर यांनी मानले.

# सोन्याच्या बिस्किटांवर डल्ला मारणाऱ्या महिलेला खारघरमधून अटक

पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

सराफी दुकानात सोने खरेदीसाठी जाऊन गाडीत ठेवलेले पैसे आणून देण्याचा बहाण्याने पाच किलो सोन्याची बिस्किटे घेऊन एका सराईत महिलेने पोबारा केला. यात 2 कोटी 60 लाखांची फसवणूक केल्याप्रकरणी फरासखाना पोलिसांनी आरोपी महिलेला खारघर येथून बेड्या ठोकत ऐवज जप्त केला अशी माहिती पोलिसांनी शुक्रवारी दिली आहे.माधवी सूरज चव्हाण (32, रा. खारघर) असे अटक करण्यात आलेल्या महिलेचे नाव आहे. याबाबत पोपटलाल गोल्डचे राकेश सोलंकी यांनी फरासखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. संशयीत आरोपी महिला ही मुळची खारघरची असून ती तिचे पती सुरज चव्हाण यांच्या बरोबर



राहण्यास आहे, तर तिचे माहेर पुण्यातच असून तिची बहीणदेखील पुण्यातच राहण्यास आहे. पुण्यातून सोने घे्ऊन ते पुढे जास्त किंमतीला देण्याचे काम ती करत करत होती. ती सध्या गर्भवती आहे.

बुधवारी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास माधवी रविवार पेठेतील पोपटलाल गोल्डच्या दुकानात आली. नेहमी किलो, अर्धा किलो अशा वजनाचे सोने ती खरेदी करत असे. बुधवारी तिने प्रेगनंट असल्याचे, वारंवार येण्यास जमणार नसल्याचे कारण देत तब्बल 5 किलो सोन्याची बिस्कीटे खरेदी केली. तिने काही रक्कम कॅश आणि काही रक्कम आरटीजीएस करणार असल्याचे सांगितले. सोन्याची बिस्कीटे खरेदी केल्यानंतर गाडीत ठेवण्यात आलेली कॅश घेऊन येण्याच्या बहाण्याने ती दुकानाच्या बाहेर पडली. दुकानदाराने देखील तिच्या मागे एक व्यक्ती पाठविला. परंतु, तिथे तिने कर्मचाऱ्याला हुलकावणी देऊन पोबारा केला. त्यानंतर तिने तिचा मोबाईल फोनदेखील बंद केला. या प्रकरणी रात्री उशिरा फरासखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर पोलिसांनी तांत्रिक विश्लेषणावरून तिचा माग काढला. दुकानाचे सीसीटिव्ही फुटेज तपासून त्या आधारे तिचा माग काढला असता ती खारघर येथे पोहोचल्याचे तपासात निष्पन्न झाले. फरासखाना पोलिसांचे पथक तिच्या अटकेसाठी रवाना झाले.

**शॉर्ट न्यूज »**

## पिंपरी महापालिकेत ३८ जागा ओबीसींसाठी आरक्षित होणार?

**पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी ।**

पिंपरी महापालिकेच्या १३९ जागांपैकी ३८ जागा ओबीसींसाठी आरक्षित होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अनुसूचित जाती आणि जमातीचे यापूर्वी निश्चित केलेले आरक्षण कायम राहणार आहे.

ओबीसी आरक्षणासह निवडणुका झाल्यास पिंपरी पालिकेतील जागांची समीकरणे व राजकीय गणिते पूर्णपणे बदलणार आहेत. एकूण ४६ प्रभागसंख्या असलेल्या पिंपरी पालिकेची एकूण सदस्यसंख्या १३९ राहणार आहे. त्यामध्ये पुरुष सदस्य ६९ व महिला सदस्यसंख्या ७० अशी वर्गवारी राहणार आहे. अनुसूचित जातींसाठी २२ जागा असून त्यापैकी ११ महिलांसाठी राखीव असतील. अनुसूचित जमातींसाठी तीन जागा असून त्यापैकी २ जागा महिलांसाठी राखीव असणार आहेत. सर्वसाधारण ११४ जागा असणार आहेत. त्यापैकी ५७ महिलांसाठी राखीव असतील,

# महापालिका अधिकारी, कर्मचाऱ्यांना 'ड्रेसकोड'!

## सुरत महापालिकेच्या धर्तीवर पिंपरी-चिंचवडमध्ये 15 ऑगस्टपासून उपाययोजना...

**पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना 'ड्रेसकोड' लागू करण्यात येणार आहे. भारतीय स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून 15 ऑगस्ट 2022 पासून वर्ग 1 आणि वर्ग 2 मधील अधिकारी याची सुरुवात करणार आहेत.**



पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या शिष्टमंडळाने नुकताच गुजरात राज्यातील सुरत महापालिकेचा अभ्यासदौरा केला. सुरत महापालिकेतील अधिकारी आणि कर्मचारी गणवेषात असतात. गणवेषाबाबतचे त्यांचे मत आणि महत्व या अभ्यासदौ-या दरम्यान शिष्टमंडळाने जाणून घेतले. गणवेषामुळे महापालिकेचे अधिकारी आणि कर्मचारी असल्याची जनमानसांत वेगळी ओळख निर्माण झाली असल्याचे तेथील अधिकारी कर्मचा-यांनी सांगितले. शिष्टमंडळामध्ये उप आयुक्त चंद्रकांत इंदलकर, कामगार कल्याण अधिकारी प्रमोद जगताप तसेच पिंपरी-चिंचवड महापालिका कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष बबन झिंजुर्डे, पदाधिकारी अभिमान भोसले, मनोज माछरे, नितीन समगीर आदींचा समावेश होता.

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या शिष्टमंडळाने नुकताच गुजरात राज्यातील सुरत महापालिकेचा अभ्यासदौरा केला. सुरत महापालिकेतील अधिकारी आणि कर्मचारी गणवेषात असतात. गणवेषाबाबतचे त्यांचे मत आणि महत्त्व या अभ्यासदौ-या दरम्यान शिष्टमंडळाने जाणून घेतले. गणवेषामुळे महापालिकेचे अधिकारी आणि कर्मचारी असल्याची जनमानसांत वेगळी ओळख निर्माण झाली असल्याचे तेथील अधिकारी कर्मचा-यांनी सांगितले.**

या शिष्टमंडळाने केलेल्या अभ्यास दौ-याची माहिती आयुक्त राजेश पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या बैठकीत उपआयुक्त चंद्रकांत इंदलकर यांनी विभागप्रमुखांसह सर्व उपस्थित अधिका-यांना दिली. सर्वांना गणवेषाची संकल्पना आवडली. सुरत महापालिकेच्या धर्तीवर सर्वांच्या सहमतीने पिंपरी चिंचवड महापालिकेच्या अधिकारी कर्मचाऱ्यांना ड्रेसकोड लागू करण्याचा निर्णय आयुक्त तथा प्रशासक राजेश पाटील यांनी घेतला.

लोकप्रतिनिधी, सर्वसामान्य नागरिक त्यांच्या कामासाठी कार्यालयात येत असतात. शिवाय शहराबाहेरील, राज्यातील, देशातील आणि देशाबाहेरील शिष्टमंडळ, विविध संस्थांचे प्रतिनिधी महापालिका कार्यालयास भेट देत असतात. तर कर्तव्यावर असताना अधिकारी कर्मचा-यांना शहरात प्रशासकीय कामासाठी फिरती, स्थळपाहणी करावी लागते. अशा वेळी शासनाचे प्रतिनिधी म्हणून सरकारी कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी यांनी कार्यालयीन वेळेत उपस्थित असताना अनुरुप पेहराव परिधान करणे गरजेचे असते. त्यातून वेगळी ओळख निर्माण होण्याबरोबरच कामाची शिस्त वाढून दैनंदिन कामकाजास गती मिळते. या दृष्टीकोनातून ड्रेसकोड लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला.

त्यानुसार महापालिकेच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचा वर्गनिहाय ड्रेसकोड निश्चित करण्यात आला आहे. निश्चित केलेल्या ड्रेसकोडनुसार अधिकारी व कर्मचारी कार्यालयात हजर राहणार आहेत. या निर्णयाची अंमलबजावणी येत्या 15 ऑगस्टपासून वर्ग 1 आणि वर्ग 2 चे अधिकारी करणार आहेत.

# राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीतील विजयाचा भाजपातर्फे 'जल्लोष'

## पिंपरी-चिंचवडमध्ये मंडलनिहाय कार्यक्रम

**। पिंपरी-चिंचवड। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत भाजपाप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या उमेदवार द्रौपदी मुर्मू यांचा बहुमताने विजय झाला. या निमित्ताने पिंपरी-चिंचवड भाजपातर्फे शहरात मंडलनिहाय जल्लोष साजरा करण्यात आला.

यावेळी राज्यसभेचे माजी खासदार अमर साबळे, विधान परिषदेच्या आमदार उमा खापरे, चिंचवड विधानसभा निवडणूक प्रभारी शंकर जगताप, माजी महापौर उषा उर्फ माई ढोरे, संघटन सरचिटणीस अमोल थोरात, सत्तारुढ पक्षनेते एकनाथ पवार, प्रदेश सचिव अमित गोरखे, सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, राजू दुर्गे, विजय फुगे यांच्यासह पदाधिकारी, सर्व मंडल अध्यक्ष, माजी नगरसेवक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### ... या ठिकाणी भाजपाचा जल्लोष

**निगडी - चिखली मंडलाच्या वतीने केएसबी चौक, चिंचवड येथे आनंदोत्सव साजरा करण्यात आला. भोसरी - चऱ्होली मंडलाच्या वतीने पीएमटी चौक भोसरी येथे जल्लो ष करण्यात आला. त्यानंतर पिंपरी- दापोडी मंडलातर्फे संत तुकाराम मंदिर, प्राधिकरण - चिंचवड स्टेशन मंडलातर्फे टिळक चौक, निगडी येथे तसेच चिंचवड गाव - किवळे मंडलातर्फे छत्रपती शिवाजी महाराज चौक ,वाल्हेकरवाडी आणि सांगवी - काळेवाडी मंडलातर्फे पंचनाथ चौक ,काळेवाडी येथे आनंदोत्सव साजरा करण्यात आला.**

आमदार महेश लांडगे म्हणाले की, देशातील आदिवासी बांधवांसाठी आजचा दिवस सुवर्णक्षण आहे. आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास असलेल्या आदीवासी संथाल समाजातील एक महिला देशाच्या सर्वोच्चपदावर विराजमान होत आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाची वाटचाल ही महाशक्तीच्या दिशेने होत आहे. पंतप्रधान मोदी यांनी देशातील सर्व घटकांना सोबत घेवून त्यांच्या प्रगतीचा ध्यास कायम ठेवला आहे.

## संपादकीय »

# जमीन पाण्यात, दावे जमिनीवर!

***सत्तेच्या धुमश्चक्रीतील उत्कंठा शमलेली नाही. पलायन-पाठिंब्यासोबत न्यायालयीन लढाही सुरू आहे. अशातच पूरसंकट ओढवले. असुविधांचे पालकत्व स्वीकारणारे गायब आहेत. शेतकऱ्यांची जमीन पाण्याखाली आणि विकासाचे दावे जमिनीवर अशी सध्याची अवस्था आहे. ..***

जमीन पाण्यात, दावे जमिनीवर! श्रीपाद अपराजित पावसाने विदर्भात कहर केला. काही उदाहरणे बघा. यवतमाळ जिल्ह्याच्या पुसद तालुक्यात पार्थिवावर अंत्यसंस्कार सुरू होते. पेटत्या चितेवर स्मशानभूमीतील सिमेंटचे शेड कोसळले. अर्धवट जळालेले पार्थिव ढिगाऱ्याखाली दबले. ते काढून पुन्हा अग्नी देण्याची वेळ नातलगांवर आली. हे शेड अवघ्या तीन वर्षांपूर्वी बांधले होते. सामान्यांना मरणानंतर मलब्यात ढकलणारे चतुर व्यवस्थेचे 'फेव्हिकॉल' महापुरालाही स्तंभित करते.

मराठवाड्यातील एका नवरदेवाचा विदर्भातील लग्नमुहूर्त पुरामुळे हुकणार होता. शेवटी थर्माकॉलवर बसून नदीचा सात किलोमीटर प्रवाह पार करीत तो कसाबसा विवाह मंडपात पोहचला. 'गावखेड्यातील लोकांना धाडसाची सवय असते' एवढे वाक्य फेकून पुढील चौकशी गुंडाळण्याला अधिकारी सरावले असतात. हीच प्रशासकीय व्यवस्था एखाद्या स्वयंसेवी संस्थेतर्फे पुढेमागे त्या नवरदेवाचा सत्कारही घडवून आणेल. नागपूरच्या सुरेंद्रगडमधील पाऊस कहाणी वेगळी आहे. तिथे महापालिकेची मराठी शाळा आहे. या शाळेच्या नव्या बांधकामासाठी महापालिकेच्या अर्थसंकल्पात यापूर्वीच निधीची तरतूद होती. परवा वर्ग सुरू असताना इमारतीची स्लॅब कोसळली. बाजूच्या हिंदी माध्यमिक शाळेत असाच प्रकार आधी घडला होता. पडलेली इमारत सील करून तेथील वर्ग या जीर्ण शाळेत सुरू होते. संततधार पावसाने हे छतदेखील काढून घेतले. 'विद्यार्थ्यांचा जीव गेला नाही' या आनंदात अधिकारी पाऊस सर्वेक्षणात व्यग्र आहेत.

चंद्रपुरातील गोंडकालीन परकोट पावसाने खचला. कोराडीची राखकथा आणखी वेगळी आहे. औष्णिक विद्युत केंद्राच्या राखेपासून उद्योग क्लस्टर उभारण्याचा सहा वर्षांपूर्वी झालेला कोट्यवधींचा निर्णय हवेत विरला. 'महाजेनको ॲश मॅनेजमेन्ट'चा बोजवारा उडाला. राख साठविलेला खासाळा तलाव फुटला. सात किलोमीटर जागेतील राख वाहून गेली. कन्हान नदीपर्यंत राख पोहचल्याने नागपूरकरांना प्रदूषित पाणी मिळेल. हजारो हेक्टर शेतीचे वाळवंट झाले. अशा संकटाला सरकारी मोबदला नसतो असे उत्तर देण्यात आले. शेतकऱ्यांच्या भरपाईचे पालकत्व स्वीकारण्यात टाळाटाळ सुरू आहे. सभोवताली अधिकाऱ्यांमध्ये आसवांचा दुष्काळ दाटल्यावर एकट्या पावसाला दूषणे देणे योग्य नाही.



## आनंदी सकाळ

# यत् दृष्टं तन्न नष्टम्

संतांचे जीवन भक्तिप्रेमाने ओथंबलेले असते. कर्तेपण त्यांनी देवाकडे सोपवलेले असते. भक्ती आपणही करतो, पण त्यात कर्तेपण स्वतःकडे ठेवतो. त्यामुळे मुळात कडू असलेले कारले जसे साखरेबरोबर खाल्ले तरी कडूच लागते, त्याचा कडूपणा घालविण्यासाठी त्याला उन्हात वाळवावे लागते; जेणेकरून त्यातील ओलावा निघून जायला हवा, तसे प्रत्येक कर्मातून मी कर्ता हा भाव निघून जायला हवा. समर्थ म्हणतात *'मी कर्ता ऐसे म्हणसी, तेणे तू कष्टी होसी। राम कर्ता म्हणता पावसी, यशकीर्ति प्रताप।'* परमार्थासाठी विवेक, तितिक्षा इत्यादी गुण आवश्यक आहेत. विवेक म्हणजे योग्य निवड. आत्मानात्मविवेक, सारासार विवेक, नीरक्षीर विवेक, द्रष्टादृश्य विवेक असे विवेकाचे प्रकार आहेत. 'विवेकामध्ये सापडेना ऐसे तो काहीच असे ना.' जे दृश्य आहे ते सर्व नष्ट होणारे आहे. यत् दृष्टं तन्न नष्टम् असे श्रुती सांगते. मग जे नष्ट होणार आहे, त्याची आसक्ती नको.ते नाम-रूप-गुणाच्या अतीत असणारे; तरीही सर्वांच्या सबाह्य अंतरी भरून असणारे असे अचंबित करणारे गुरुतत्त्व परावाणीच्याही अतीत आहे.

# बदल झाला की आशा पालवतात






बदल झाला की आशा पालवतात, हा मनुष्यस्वभाव आहे. त्यामुळे सत्ताबदल कुठलाही, कुठेही, कशाही पद्धतीने झालेला असो, आता सारे चांगले होणार, असे वाटल्यास काहीही गैर नाही. त्यात महाराष्ट्रातील सत्तापालट हा तर हिंदुत्वासाठी झालेला. ते काय हे समजा कुणाला नाही नीटसे सांगता आले, तरी ते एक उच्च, उदात्त आणि उन्नत असे तत्त्व आहे हे सर्वांनाच माहीत. त्यामुळे आशा समजा आणखीच उंचावल्या, तरी चालेल. असे सारे एका उंचीवरले वातावरण असताना '१०० कोटी रुपये' हा गतसरकारशी जोडला गेलेला आकडा पुन्हा ऐकू येण्याचे काहीही कारण नव्हते. तरीही गेल्या आठवड्यात लहानशा बातमीतून का होईना, '१०० कोटी' हे शब्द पुन्हा नव्या रंगात, नव्या ढंगात महाराष्ट्राच्या राजकारणात प्रवेश करते झाले. काय तर म्हणे, महाराष्ट्रातील कॅबिनेट मंत्रीपदांसाठी कुणा आमदारांकडे १०० कोटी रुपये मागण्यात आले. मुद्दा १०० कोटींचा नसून, बातमी लहानशीच ठरली, हा आहे.

एखादी बातमी फार मोठी ठरत नाही, याला अगदी तांत्रिक कारणेही असतात. एक तर हे पैसे घेण्यासाठी आलेल्या इसमाला मुंबई पोलिसांच्या खंडणीविरोधी पथकाने सापळा रचून पकडले, मग त्याच्याकडून अन्य तिघा साथीदारांचीही नावे कळली.. थोडक्यात, गुन्हे आणि पोलीस यांच्या बातम्या ज्या तऱ्हेने संपणे अपेक्षित असते, तसा शेवट या बातमीचा झाला. मग आता बातमीत आणखी काय लिहिणार? ज्या आमदारांकडे पैसे मागितले गेले त्यांची नावे, ज्या एका आमदाराच्या स्वीय सचिवाने तक्रार नोंदवली त्याचे नाव आणि आरोपींची नावे, हे तपशील बहुतेक प्रसारमाध्यमांनी उघड केले होतेच. तरीही बातमीची लांबी वाढवण्यासारखे काही नसणे, हे झाले तांत्रिक कारण. खंडणीविरोधी पथकाने काय कारवाई केली याबद्दलच्या अन्य प्रसंगी येणाऱ्या बातम्यासुद्धा अशाच असतात, त्या फार लांबरुंद नसतात. म्हणजे ती बातमी आकाराने लहान असण्यात गैर असे काहीही नाही. विशेषत: छापील माध्यमांतील बातम्यांचे आकार लहानमोठे असतातच आणि या आकाराचा संबंध बातमीच्या परिणामकारकतेशी असतोच, असेही नाही. समाज किती सजग आहे, याचाही एखाद्या बातमीची परिणामकारकता ठरवण्यात मोठा असतो. ही बातमी परिणामकारकतेतही 'लहानशीच' ठरली की काय, अशी शंका आज तीन-चार दिवसांनंतर वाचकांसह सर्वांनाच यावी.

# ओबीसी आरक्षणाचे क्षणिक सुख

**बांठिया आयोगाने चुकीच्या पद्धतीने केलेल्या ओबीसी आरक्षणाच्या शिफारशी आणि त्यावर सर्वोच्च न्यायालयाने दिलेला सकारात्मक निर्णय हे केवळ ओबीसी समाजासाठी क्षणिक सुख आहे. त्याचे दूरगामी परिणामही होऊ शकतात, याचा विचार क्षेत्रवादाच्या लढाईत मग्न असलेले पक्ष करत नाहीत.**

प्रगत तंत्रज्ञान, शासकीय यंत्रणा, कुशल मनुष्यबळ असूनही बांठिया आयोगाने फक्त आडनाव आधार मानून घाईघाईने केलेले सर्वेक्षण तर्कहीन आहे. अहवालात दाखविली गेलेली ओबीसी समाजाची फक्त ३७ टक्के लोकसंख्या आणि त्यातही आठ महानगरपालिका व पाच जिल्ह्यांमध्ये ओबीसींची अत्यल्प संख्या हा चिंतेचा विषय आहे. सर्वोच्च न्यायालयाने स्वीकारलेला अहवाल शासनाने पुढील अनेक समाज कल्याणाच्या योजना राबवताना आधार मानला तर ते ओबीसी समाजासाठी अन्यायकारक ठरू शकते. म्हणून श्रेयवादाची लढाई लढताना सर्वपक्षीय नेत्यांनी जातीनिहाय जनगणनेचा आग्रह धरावा व बांठिया आयोगाने दिलेल्या क्षणिक सुखाचे कायम सुखात परिवर्तन करावे.

नेमकेपणा, स्पष्टपणा आणि कायदा व नियमांची कठोर अंमलबजावणी या भारतीय आणि



विशेषत: महाराष्ट्रीय राजकीय व्यवस्थेस न आवडणाऱ्या गोष्टी आहेत. याचा प्रत्यय १९९४ सालाच्या कोणत्याही पाहणी आणि जनगणनेशिवाय झालेल्या आरक्षणवाढीमुळे आणि इतर मागास प्रवर्गात शेकडो जातींच्या समावेशामुळे आला. असे प्रत्यय अनेक वेळा आणि अनेक बाबतींत आलेले आहेत.

सद्य:स्थितीत अनेक किंबहुना सर्वच राजकीय पक्ष (मराठा, इतर मागास वर्ग यांना) आरक्षण देण्याची भाषा करतात, परंतु प्रत्यक्षात मात्र हे सर्व आरक्षण 'संपविण्याच्या' मार्गाने जात आहेत. जातनिहाय जनगणनेसाठी कृतिशील पावले उचलली जाताना दिसत नाहीत. राजकारणातील महत्त्वाचा आणि न संपणारा मुद्दा म्हणून आरक्षण या विषयाकडे पाहिले जात असताना जनतेने राजकीय पक्ष आणि प्रतिनिधींना एक गोष्ट लक्षात आणून देणे आवश्यक आहे की, आरक्षणाशिवाय अनेक मुद्दे आहेत ज्यावर आपण अनेक वर्षे राजकारण करू शकतो. या एका मुद्द्यावर समाजमनाला झुलवत आणि भुलवत ठेवणे हे आजारी व्यवस्थेचे लक्षण आहे आणि एखादा समाज आजारी पडल्यास त्याचा संसर्ग सर्वच समाजस्तरांना होणार हे नक्की!

१९९०ला व्ही. पी. सिंग सरकारने मंडल आयोग लागू करण्याचा निर्णय घेतल्यानंतर ओबीसी आरक्षणाला कोणाचा विरोध होता व आताही कोणाचा विरोध आहे, हे ओबीसी समाजाच्या लक्षात आले आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आलिंगनें घडे ।
मोक्ष सायुज्यता जोडे ॥१॥
ऐसा संताचा महिमा ।
जाली बोलायाची सीमा ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### जिल्हा परिषद, पंचायत समित्यांचे आरक्षण 5 ऑगस्टला जाहीर होणार

। मुंबई । महाईन्यूज ।

राज्यातील 25 जिल्हा परिषद आणि त्या अंतर्गत येणाऱ्या 284 पंचायत समितींच्या सार्वत्रिक निवडणुकांचा आरक्षण सोडतीचा सुधारित कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. याबाबतचे आदेश राज्य निवडणूक आयोगाने दिले आहेत. यामध्ये अनुसूचित जाती आणि जमातींचे जुने आरक्षण कायम ठेवण्यात येणार असून सर्वसाधारण (महिला), नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) यांचे आरक्षण नव्याने काढण्यात येणार आहे. 5 ऑगस्ट रोजी नवीन आरक्षण सोडत जाहीर होणार आहे. राज्य निवडणूक आयोगाने या आधी 27 जून रोजी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती गणांची अंतिम प्रभाग रचना जाहीर केली होती. परंतु सर्वोच्च न्यायालयाने ओबीसी आरक्षणासह निवडणुकीचा मार्ग मोकळा केल्यानंतर आता जुनी आरक्षण सोडतीची प्रक्रिया स्थगित करण्यात आली आहे. त्यानंतर राज्य निवडणूक आयोगाने आता नवीन कार्यक्रम जाहीर केला आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या नवीन कार्यक्रमानुसार, 26 जुलै रोजी आरक्षण जाहीर करण्यात येणार आहे.

# रुग्णांना झोळीत बांधून, वाहती नदी पार करुन रुग्णालयात दाखल!

## पाथर्डी ग्रामपंचायत हद्दीतील भाटीपाड्यातील विदारक स्थिती

। पालघर । महाईन्यूज ।

एकीकडे केंद्र सरकार डिजिटल आणि कॅशलेस इंडियाची भाषा करत आहे, तर राज्य शासनाकडून 'आरोग्य यंत्रणा तुमच्या दारी' अशी संकल्पना राबवण्यात येत आहे. मात्र ज्या गावात अजूनही रस्ताच पोहचला नाही, त्या गावातील रुग्णांच्या समस्या संपता संपेना. अशी परिस्थिती आजही कायम आहे. पाथर्डी ग्रामपंचायत हद्दीतील भाटीपाड्यातील एका रुग्ण महिलेला चालता येत नसल्याने, त्या रुग्णाला ग्रामस्थांनी झोळीत बांधून वाहत्या नदीतून डोंगर, टेकड्या चढत, जव्हारच्या कुटीर रुग्णालयात दाखल केले आहे. रुग्ण महिलेला झोळीत बांधून काळशेती नदीतून रुग्णालयात दाखल केल्याचा प्रकार शुक्रवारी घडला आहे. या भागातील गरोदर महिलांसह रुग्णांचे अतोनात हाल होत असून, स्वातंत्र्यानंतर त्या भाटीपाड्यातील रुग्णांसह, नागरिकांनाही हाल सहन करावे लागत आहेत.



जव्हार तालुक्यातील भाटीपाडा येथील 40 वर्षीय लक्ष्मी लक्ष्मण घाटाळ या महिलेच्या पायाला मोठी दुःखापत झाली होती. जखम अधिक वाढत गेल्याने, या रुग्ण महिलेला पायी चालणे कठीण झाले. या जखमी महिलेला रुग्णालयात दाखल केले नाही, तर तीचा जीव जाण्याची शक्यता होती. अखेर तेथील ग्रामस्थांना त्या जखमी महिलेला झोळीत बांधून वाहत्या काळशेती नदीतून जावं लागलं. काळशेती नदीचे 100 मीटरचे पात्र असून ती मोठी नदी आहे. सध्या पावसाळा असल्याने, नदीचे पात्र भरलेलं आहे. त्यानंतर त्या महिलेला झोळीतून डोंगर, टेकड्या चढून मुख्य रस्त्यापर्यंत तीन किमी पायी प्रवास करावा लागला. त्या जखमी महिलेवर सध्या जव्हारच्या कुटीर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. जव्हार तालुक्यातील ग्रामपंचायत पाथर्डी हद्दीतील भाटीपाड्यात एकूण 35 कुटुंबे वास्तव्य करत आहेत. हा भाटीपाडा काळशेती नदीच्या बाजूला आहे. येथील कुटुंबाची शेतीची जागा, प्लॉट त्या बाजूला असल्याने अनेक वर्षांपासून ही कुटुंबे त्या ठिकाणी वास्तव्याला आहेत. त्या भाटीपाडा गावात जाण्यासाठी रोजगार हमीतून केलेला कच्चा रस्ता आहे. तसेच पावसाळ्यात साधी मोटारसायकल देखील त्या भाटीपाड्यात जात नाही. त्यामुळे पावसाळ्यात रस्ता बंद असतो. तसेच भाटीपाड्यात जाण्यासाठी काळशेती नदीवर पूल नसल्याने, पावसाळ्याची तजवीज करून ठेवावी लागते. पावसाळ्यात रुग्ण, गरोदर महिला, सर्प दंश झालेल्या रुग्णांचे हाल होऊन अनेकांना जीव गमवावा लागल्याचे तेथील ग्रामस्थांनी सांगितले.

भाटीपाड्यात नागरिकांनी अनेक वर्षांपासून नदीवर पूल आणि रस्त्याची मागणी केली आहे. मात्र त्या गाव-पाड्यांना जाण्यासाठी अजून रस्त्याचे झाले नसल्याचे चित्र आहे. तसेच या भागात पाथर्डीपैकी भाटीपाडा, तर ग्रामपंचायत झापचे काही पाडे असून, असे जवळपास 4 ते 5 पाडे आहेत. मात्र त्या आदिवासी पाड्यांमध्ये स्वातंत्र्यापासून रस्ताच झाला नाही. तर पावसाळ्यात त्या परिसरातील नागरिक आणि रुग्णांचे नेहमीच हाल पाहायला मिळतात. त्या आदिवासी पाड्यांना अजूनही रस्ताच नाही, तर मग अँब्युलन्स येणार तरी कुठून? ग्रामस्थ अँब्युलन्सची वाट न पहाता वर्षानुवर्षे रुग्णांना, गरोदर महिलांना दवाखान्यात पोहोचविण्यासाठी झोळीचा आधार आहे. पुन्हा एकदा ऐन पावसाळ्यात अशी घटना घडली आहे. रुग्ण महिलेला झोळीने बांधून दवाखान्यात पोहोचवावे लागले. येथील आजारी रुग्णांना ग्रामस्थही एकमेकांना धावून येतात, आणि यावेच लागते. एकमेकांवर ही पाळी येत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. गरोदरपणात या भागातील महिला नातेवाईकांकडे जातात.मनमोहाडी, भाटीपाडा आणि इतर पाड्यातील गरोदर माता, रुग्ण, महिलेची प्रसुतीची वेळ, तारीख जवळ आली की गरोदर महिलांना तालुक्याच्या ठिकाणी, त्यांच्या नातेवाईकांकडे येऊन थांबावे लागते.

# मुंबईत शिवसैनिकांचा ठाकरेंनाच पाठिंबा!

## लोकप्रतिनिधींच्या बंडामुळे हादरा; 1 खासदार, 5 आमदार, 2 नगरसेवकांचे शिवबंधन सुटले

मुंबई । महाईन्यूज ।

मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या बंडखोरीमुळे मुंबईत लोकप्रतिनिधींनी पक्ष सोडला. मात्र, शिवसैनिकांसह नगरसेवक उद्धव ठाकरेंच्या पाठीशी असल्याचे चित्र पाहायला मिळते आहे. मुंबईतील खासदार राहुल शेवाळे यांच्यासह 5 आमदार आणि 2 नगरसेवकांनी शिंदे गटात प्रवेश केला आहे. मात्र, मुंबईतील बाकीचे नेते ठाकरे कुटुंबीयासोबत आहेत. यातून मुंबईतील शिवसेनेवर ठाकरेंची पकड अजून सैल पडलेली नाही असे दिसून येते. शिवसेनेच्या निर्णय प्रक्रियेतील महत्त्वाचे ठरणारे पदाधिकारी अद्याप उद्धव ठाकरेंसोबतच असल्याचे दिसून येत आहेत.

शिवसेनेचे मुंबईतील हे नेते ठाकरेंसोबतखासदार अरविंद सावंत,



गजानन कीर्तिकर.आमदार– आदित्य ठाकरे, रवींद्र वायकर, सुनील राऊत, सुनील प्रभू, संजय पोतनीस, रमेश कोरगावकर,प्रकाश फातर्पेकर, अजय चौधरी.

मुंबई मनपातील 82 माजी नगरसेवक हे उद्धव ठाकरेंसोबत असून केवळ 2 नगरसेवक हे शिंदेंच्या गटात गेले आहे. तर 5 आमदार आणि 1 खासदारांव्यतिरिक्त बोटावर मोजता येईल एवढ्याच शिवसैनिकांनी शिंदे गटात जाण्याचा निर्णय घेतला. मात्र, बाकीच्या सर्व शिवसैनिक, विभाग प्रमुख, उप विभाग प्रमुख, शाखाप्रमुख, गटप्रमुखांनी मात्र शिवबंधन जपल्याचे बघायला मिळते आहे.

एकनाथ शिंदेंच्या बंडखोरीनंतर खासदार राहुल शेवाळे, आमदार– प्रकाश सुर्वे, मंगेश कुडाळकर, यामिनी जाधव, दिलीप लांडे, सदा सरवणकर यांनी शिंदेंचे नेतृत्व स्वीकारले आहे. तर माजी नगरसेवक आणि आमदार यामिनी जाधव यांचे पती यशवंत जाधवांसह नगरसेविका शीतल म्हात्रेंच्या 15 ते 20 माजी पदाधिकाऱ्यांनी मुख्यमंत्री शिंदेंना आपला नेता म्हणून स्वीकारले आहे.

### आजही ठाकरेंना पाठिंबा



शिवसेनेच्या 40 आमदारांनी पक्षविरोधात बंड केला आणि पक्ष प्रमुख उद्धव ठाकरेंना मुख्यमंत्रिपद सोडावे लागले. यानंतर बंडखोर आमदार एकनाथ शिंदेंच्या गळ्यात मुख्यमंत्रिपदाची माळ पडली आणि त्यांनी शिवसेना पोखरायला सुरुवात केली. राज्यभरातील अनेक शिवसैनिक, लोकप्रतिनिधी त्यांनी आपल्या गटात सामिल करून घेतले. मात्र, असे असताना मुंबईतील खासदार-आमदार आणि माजी नगरसेवक मात्र शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरेंच्या सोबत असल्याचे दिसून येत आहे.

### मुंबईत प्रतिष्ठा पणाला

शिवसेनेत झालेल्या ऐतिहासिक बंडखोरीनंतर आता आगामी मुंबई मनपा निवडणुकीत उद्धव ठाकरे यांची प्रतिष्ठा पणाला लागणार आहे. एकनाथ शिंदे यांचा ठाण्याबरोबरच मुंबईतही प्रभाव असल्याचे कायम चर्चिले जाते. यामुळे मुंबई मनपामध्ये सत्ता राखण्याचे मोठे आव्हान आता शिवसेना नेतृत्वापुढे आहे.

### मुंबईत 'मातोश्री'वर निष्ठा

गेली अनेक वर्षे मुंबईतील निवडणुकांच्या उमेदवारीसाठी मातोश्रींचा शब्द अंतिम समजला जातो आणि तो पाळला देखील जातो. शिवसैनिकांनी बाळासाहेब ठाकरे यांचे आदेश मानले, त्यानंतर उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांचे नेतृत्व स्वीकारले. यामुळे शिंदे गटात 8 लोकप्रतिनिधीसह बोटावर मोजता येण्याइतकेच शिवसैनिक मुंबईतून गेले.

### पण प्रभावी नेतृत्वाचा प्रश्न

मुंबईत शिवसेनेचे अनेक मोठे नेते आहेत मात्र, त्यांचा जनमानसात प्रभाव दिसून येत नाही.माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी, माजी केंद्रीय मंत्री अरविंद सावंत, दत्ताजी साळवी असे अनेक नेते मुंबई शिवसेनेत होते. मात्र त्यांना मुंबईत आपली छाप सोडता आली नाही. याउलट ठाण्यात आनंद दिघे आणि एकनाथ शिंदेंनी आपल्या कामातून स्वत:चे वेगळे अस्तित्व तयार केले आहे. मुंबईतील नेत्यांनी आपली निष्ठा ठाकरे कुटुंबीयांशी राखत त्यांच्या विरोधात उभे राहण्याचा प्रयत्न केला नाही.

## शॉर्ट न्यूज »

### सोनिया गांधी यांची 'ईडी'कडून दोन तास चौकशी

।नवी दिल्ली। महाईन्यूज ।प्रतिनिधी।

'नॅशनल हेराल्ड'प्रकरणी अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) गुरुवारी काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी यांची दोन तास चौकशी केली त्यांना पुन्हा चौकशीसाठह बोलावण्यात येण्याची शक्यता असल्याचे 'ईडी'तील सूत्रांनी सांगितले

'नॅशनल हेराल्ड' प्रकरणात गेल्या महिन्यात काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यापाठोपाठ सोनिया गांधी यांना 'ईडी'ने चौकशीसाठी बोलावले होते मात्र, सोनिया गांधी यांना करोनाची लागण झाल्याने त्यांची चौकशी लांबणीवर गेली काँग्रेसच्या जोरदार शक्तिप्रदर्शनात सोनिया गांधी गुरुवारी 'ईडी' चौकशीला सामोऱ्या गेल्या सोनिया या नुकत्याच करोनामुक्त झाल्या असून, त्यांच्या विनंतीनुसार दोन तासांनी चौकशी थांबविण्यात आल्याचा दावा 'ईडी'च्या अधिकाऱ्यांनी केला मात्र,

## अमेरिकेत 'द बर्निंग ट्रेन

# धावत्या रेल्वेला आग !

### :प्रवाशांनी खिडक्यांतून उड्या मारून वाचवला जीव, रेल्वेत 200 प्रवाशी होते

।नवी दिल्ली । महाईन्यूज ।प्रतिनिधी।

अमेरिकेच्या बोस्टनमध्ये एका धावत्या रेल्वेला आग लागली. त्यामुळे काही प्रवाशांनी जिवाच्या आकांताने खिडक्यांतून उड्या मारल्या. त्यात ते जखमी झाले. एकाने तर पुलावरून थेट नदीत उडी मारली. घटनेवेळी रेल्वेत 200 च्या आसपास प्रवाशी होते.

CBS न्यूज बोस्टनच्या वृत्तानुसार, रेल्वे मिस्टिक नदीवरील पुलावरून जात होती. तेव्हा तिच्या इंजिनाने अचानक पेट घेतला. ही रेल्वे सोमरव्हिलला जात होती. या घटनेचा एक व्हिडिओ सोशल मीडियात चांगलाच व्हायरल झाला आहे. त्यात प्रवाशी जिवाच्या आकांताने रेल्वेच्या दारे-खिडक्यातून उड्या मारताना दिसून येत आहेत. ही घटना गुरूवारी घडली. पण, व्हिडिओ व्हायरल



झाल्यानंतर ती शुक्रवारी उजेडात आली.

एक महिला प्रवाशी म्हणाली -मी खूप घाबरले होते. काय सुरू आहे हे काहीच कळत नव्हते. त्यानंतर रेल्वेने पेट घेतल्याचे समजले. रेल्वेचे दरवाजे बंद होते. लोक जीव वाचवण्यासाठी विंडोतून बाहेर पडत होते. काही जणांनी तर थेट नदीत उड्या मारल्या. थोड्या वेळातच जळल्याचा वास येऊ लागला.

त्यानंतर काही वेळाने डोळ्यापुढे धूर दिसू लागला. त्यावेळी आम्ही काही स्फोटांचे आवाजही ऐकले. यामुळे आमची पाचावर धारण बसली. मी रेल्वेतून आगीच्या ज्वाळा बाहेर पडताना पाहिल्या. हा अनुभव फार भयावह होता.

एका अधिकाऱ्याने ही आग शॉर्ट सर्किटमुळे लागल्याचा अंदाज व्यक्त केला. आग लागल्यानंतर वीज पुरवठा बंद करण्यात आला.

एका अधिकाऱ्याने ही आग शॉर्ट सर्किटमुळे लागल्याचा अंदाज व्यक्त केला. आग लागल्यानंतर वीज पुरवठा बंद करण्यात आला.

#### कोणतीही जिवितहाणी नाही

ट्रेन मेसाच्युसेट्स बे ट्रान्सपोर्टेशन अथॉरिटीची (MBTA) होती. तिचे व्यवस्थापक स्टीव्ह पोफ्तक म्हणाले -रेल्वेखालची मेटलशीट विजेच्या संपर्कात आल्यामुळे ही आग लागल्याची भीती आहे. अपघातानंतर तत्काळ वीज पुरवठा बंद करण्यात आला. त्यानंतर रेल्वे तपासणीसाठी रेल्वेयार्डात आणण्यात आली. सध्या आगीच्या कारणांचा शोध घेतला जात आहे. या अपघातात कोणतीही प्राणहाणी झाली नसल्याचे ते म्हणाले.

#### बोस्टन मेट्रोच्या सेफ्टी सिस्टममध्ये बिघाड

या घटनेमुळे बोस्टन मेट्रोच्या सुरक्षा प्रणालीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. एप्रिल महिन्यात एका स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवर फरफटत गेल्यामुळे एका व्यक्तीचा मृत्यू झाला होता. या व्यक्तीचा हात रेल्वेच्या दरवाज्यात अडकला होता. तत्पूर्वी, सप्टेंबर महिन्यात एका स्थानकावरील एस्कलेटर खराब झाल्यामुळे 9 जण जखमी झाले होते.

# नीरव मोदीला मोठा दणका !

### हाँगकाँगमधील कोट्यवधींची संपत्ती ईडीकडून जप्त

। नवी दिल्ली ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

पीएनबी घोटाळ्यात 10 हजार कोटींचा घोटाळा करुन फरार झालेला मुख्य आरोपी नीरव मोदी याला ईडीनं मोठा दणका दिला आहे. नीरव मोदीची हाँगकाँगमधील सुमारे अडीचशे कोटींची चल संपत्ती ईडीनं जप्त केली आहे.

या कारवाईत जप्त केलेल्या संपत्तीमध्ये काही रत्न आणि ज्वेलरीसह बँकेतील रक्कमेचा समावेश आहे. नीरव मोदीची हाँगकाँगच्या बँकेत ३०.९८ मिलियन अमेरिकन डॉलर आणि ५.७५ मिलियन हाँगकाँग डॉलर इतकी रक्कम होती. यासंपूर्ण संपत्तीची एकत्रित रक्कम २५३.६३ कोटी रुपये होते, ईडीनं आपल्या निवदेनात ही माहिती दिली आहे.





पंजाब नॅशनल बँकेला ६४९८.२० कोटी रुपयांचा चुना लावल्यानं आर्थिक घोटाळाप्रकरणी नीरव मोदीची ईडी, सीबीआयकडून तपास सुरु आहे. या तपासादरम्यान नीरव मोदी ग्रुप ऑफ कंपनीजची हाँगकाँगमध्ये काही मालमत्ता जी रत्ने आणि ज्वेलरीच्या रुपात तसेच खासगी बँकेच्या व्हॉल्टमध्ये काही रक्कम असल्याचं असल्याचं उघड झालं होतं. त्यानुसार ईडीनं ही ताजी कारवाई केली आहे. यापूर्वी ईडीनं नीरव मोदी आणि त्याच्याशी संबंधीत व्यक्तींची भारत आणि विदेशातील २,३९६.४५ कोटींची चल आणि अचल मालमत्ता जप्त केली होती. दरम्यान, नीरव मोदी हा सध्या लंडनमध्ये असून त्याची प्रत्यार्पणाची कार्यवाही ही अंतिम टप्प्यात आहे. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर नीरव मोदीला भारतात आणण्यात येईल. त्यानंतर भारत-इंग्लंड प्रत्यार्पण कायद्यातील अटींच्या अधिन राहून भारतीय कायद्यांनुसार त्यांच्यावर आर्थिक घोटाळ्याप्रकरणी कारवाई होईल.

# एकनाथ शिंदे-देवेंद्र फडणवीस दिल्ली दौऱ्यावर

### मंत्रिमंडळ विस्तारावर चर्चा होण्याची शक्यता

। नवी दिल्ली ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

राज्यात शिंदे गट-भाजपा यांचे संयुक्त सरकार स्थापन होऊन तीन आठवडे उलटले आहेत. मात्र अद्याप मंत्रिमंडळ विस्तार झालेला नाही. असे असताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सध्या दिल्ली दौऱ्यावर आहेत. दिल्लीमध्ये मावळते राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या निरोप समारंभाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाला शिंदे आणि फडणवीस हजेरी लावणार आहेत. या द्वयींच्या दिल्ली दौऱ्यादरम्यान खातेवाटप, मंत्रिमंडळ विस्तारावर



चर्चा होण्याची शक्यता आहे.

शिंदे गटातील १६ बंडखोर आमदाराच्या अपात्रतेसह सरकारची स्थापना, विधानसभा अध्यक्षांची नेमणूक तसेच इतर प्रकरणांवरील दाखल याचिकांवर पुढील सुनावणी एक ऑगस्ट रोजी होणार आहे. याच कारणामुळे अद्याप मंत्रिमंडळ विस्तार झालेला नाही. न्यायालयाच्या निर्णयानंतर मंत्रिमंडळ विस्तार करावा असे शिंदे-भाजपाचे मत आहे. या मंत्रिमंडळात शिंदे गटाला १३ ते १४ मंत्रिपदं मिळण्याची शक्यता आहे.

# कॉमेडीचा अस्सल पॅटर्न! सुरू होणार 'महाराष्ट्राची हास्यजत्रा'

गेल्या काही वर्षात सोनी मराठी SONY MARATHI वाहिनीवर 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' (MAHARASHTRACHI HASYAJATRA) या मालिकेने अक्षरशः महाराष्ट्राला वेड लावलं आहे. एकास एक पात्र, उत्तम संहिता आणि ते सादर करणारे इरसाल नमुने म्हणजेच आपले हास्यरथी यांनी आपलयाला खळखळून हसवलं. या मालिकेने विनोदाची आणि यशाची मोठी उंची गाठली आहे. गेली अडीच वर्षे या कार्यक्रमाने आपले अविरत मनोरंजन केले. परंतु मध्यंतरी एक




छोटासा ब्रेक घेण्यात आला होता. त्या दरम्यान प्रेक्षकांनी या कार्यक्रमाची खूप वाट पाहिली. आता पुन्हा एकदा आपल्या मनोरंजनासाठी 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' नवा हंगाम घेऊन सज्ज झाली आहे.

काही दिवसांपूर्वी सोनी मराठी वाहिनीचे कंटेंट हेड अमित फाळके यांनी 'न्यू सीझन सून...' असं म्हणत याबाबतची एक पोस्ट शेअर केली होती. कारण या कार्यक्रमाने काही महिन्यांचा ब्रेक घेण्याचा निर्णय घेतला होता. नुकताच या कार्यक्रमाचा प्रोमो सोशल मीडियाद्वारे प्रदर्शित झाला आणि प्रेक्षक पुन्हा आनंदुन गेले. 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' लवकरच म्हणजे 15 ऑगस्ट पासून आपल्या भेटीला येत आहे. वाहिनीने सोशल मिडियावर शेयर केलेल्या प्रोमोमध्ये प्रसाद खांडेकर, वनिता खरात, नम्रता संभेराव, शिवाली परब, दत्तू मोरे हे कलाकार दिसत आहेत. 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' हा कार्यक्रम आठवड्यातील चार दिवस प्रेक्षकांना पाहता येणार असल्याचे या प्रोमोतून जाहीर करण्यात आले आहे.

## संतोष जुवेकरने शेअर केली 'ती'ची गोड आठवण.. तुम्हालाही आठवतील 'ते' दिवस

झेंडा, मोरया, एक तारा आणि यासारखे कितीतरी चित्रपट गाजवलेला एक उत्तम अभिनेता म्हणजे संतोष जुवेकर. तो सोशल मिडियावरही बराच सक्रिय असतो. त्याचा चाहता वर्ग मोठा आहे. संतोष अभिनया सोबत सामाजिक कामातही बराच सक्रिय असतो. नुकतेच त्याने एक पोस्ट केली आहे. यामध्ये त्याने 'वादळवाट' मालिकेची आठवण सांगितली आहे. यासोबत मिताली जगताप सोबत एक फोटो शेयर केला आहे.

'वादळवाट' ही मालिका आपण आजही विसरलेलो नाही. झी मराठी वरील सर्वाधिक गाजलेली ही मालिका आजही प्रेक्षकांच्या स्मरणात आहे. या मालिकेतून समोर आलेले नवोदित कलाकार पुढे मराठीतले सुपरस्टार झाले. 2003 मध्ये आलेली ही मालिका आजही ही प्रेक्षक आवडीने पाहतात. याच मालिकेतून अभिनेता संतोष जुवेकर प्रसिध्द झाला. याच मालिकेतील एक विडिओ शेयर करत संतोषनं एक खास आठवण



सांगितली आहे. त्यात संतोष जुवेकर आणि मिताली जगताप यांची जोडी होती. संतोषनं त्या दोघांतल्या प्रेमाच्या संवादाचा एक व्हिडिओ शेअर केला आहे. त्यावर त्यानं लिहिलं आहे, 'एक खूपच गोड आठवण तुमच्या सोबत शेअर करतोय. खरं तर ती आपल्या सगळ्यांचीच गोड आठवण आहे.' असं लिहून त्यानं मालिकेतल्या अनेक कलाकारांना टॅगही केलं आहे. प्रसाद ओक, सुबोध भावे, उमेश कामत, आदिती सारंगधर, लोकेश गुप्ते असे दिग्गज कलाकार यात मालिकेत होते.

## ट्विंकलच्या पाया पडावं लागतं! अक्षय कुमारनं सांगितलं कारण

बॉलीवूडचा खिलाडी अक्षय कुमार आणि त्याची पत्नी अभिनेत्री ट्विंकल खन्ना सोशल मीडियावर चाहत्यांच्या कौतूकाचा विषय असतात. त्यांच्या पोस्ट, व्हिडिओ या नेहमीच चाहत्यांचे लक्ष (वेधून घेतात. अक्षय आणि ट्विंकलमध्ये असणाऱ्या बॉंडिंगची चर्चा होत असते. ट्विंकल अक्षयची केमिस्ट्री चर्चेचा विषय असतो. ट्विंकल आता उत्तम लेखिका झाली आहे. तिची दोन पुस्तकं प्रकाशित झाली आहे. अक्षयनं अभिनयासोबतच सामाजिक कामांमध्ये सक्रिय सहभाग घेण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे त्याच्या फॅन क्लबमध्ये मोठी वाढ झाली आहे. हे दोन्ही सेलिब्रेटी करण जोहरच्या कॉफी विथ करणमध्ये सहभागी झाले



होते.

अक्षय आणि ट्विंकलचा स्वभाव पूर्णपणे वेगळा आहे. बऱ्याचशा मुलाखतींतून अक्षयनं त्याच्या वैयक्तिक आयुष्याविषयी चाहत्यांना सांगितलं आहे. त्यांच्यातील अनोख्या बॉंडिंगमुळे त्यांचं प्रेम आणखी फुलून येताना दिसते. अक्षय, टॉलीवूडची प्रसिद्ध अभिनेत्री समंथा रुथ प्रभु करणच्या कार्यक्रमात आले होते.

## अजय देवगण,सूर्या ठरले

६८ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांची आज दिल्लीत घोषणा कऱण्यात आली. कोरोनामुळे गेल्या दोन वर्षांपासून पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम झाला नव्हता. मात्र पुरस्कारांची घोषणा करण्यात आली होती. राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांसाठी १० सदस्यीय परीक्षक मंडळाचे नेतृत्व चित्रपट निर्माता विपूल शहा यांनी केले. इतर सदस्यांमध्ये धरम गुलाटी, जीएस भास्कर, श्रीलेखा मुखर्जी, ए कार्तिकराजा, व्हीएन आदित्य, संजीव रतन, विजी तंपी, एस थंगदुरई आणि निशिगंधा यांचा





## सोनूची आर्थिक तंगी, २००० रुपये वाचवायला बदललं होतं घर

'तारक मेहता का उल्टा चष्मा' या मालिकेचा चाहतावर्ग बराच मोठा आहे. या शो ने फक्त लोकांतं मनोरंजन केलं नाही तर कितीतरी कलाकारांना आपली कला दाखवण्याची संधी उपलब्ध करुन दिली. अशाच काही कलाकारांमध्ये तारक मेहता का उल्टा चष्मा मधील सोनू उर्फ पलक सिंधवानी(PALAK SINDHWANI) हिचं नाव देखील घेता येईल. आज भले लोकांसाठी पलक एक ओळखीचं नाव आहे, पण एक तो काळ होता जेव्हा पलकला पैशासाठी खूप स्ट्रगल करावं लागलं होतं.



बाहेरुन कलाकारांचे जग जेवढं चमकदार वाटतं,तेवढं आतून ते मूळीच नसतं. तारक मेहता फेम पलक सिंधवानीचा अभिनय क्षेत्रातील प्रवास देखील सोपा नव्हता. 'तारक मेहता का उल्टा चष्मा' मालिकेचा भाग बनण्याआधी पलकला पैशासाठी खूप स्ट्रगल करावं लागलं. इतकंच नाही तर आर्थिक संकटामुळे अनेकदा तिला आपलं भाड्याचं घरही बदलावं लागलं आहे. कारण तसं करुन किमान २००० रुपये तरी आपले वाचतील असा विचार ती तेव्हा करायची. एका इंग्रजी वेबसाईटला दिलेल्या मुलाखतीत पलक सिंधवानीने आपल्या स्ट्रगलवर खूप मोकळेपणाने भाष्य केले आहे. पलक म्हणाली आहे की,"मुंबईत सुरुवातीच्या काळात मला पैशासाठी खूप झगडावं लागलं. लॉकडाऊनच्या काळात मी स्वतःचे युट्युब चॅनल खोलणार होती.

## शॉर्ट न्यूज »

### क्रॅस्टोची दुहेरी आगेकूच; कश्यपही विजयी



तैपेई।। महाईन्यूज

भारताची प्रतिभावान बॅडमिंटनपटू तनीषा क्रॅस्टोने तैपेई खुल्या स्पर्धेतील दमदार कामगिरी सुरू राखताना महिला आणि मिश्र दुहेरी गटाची उपांत्यपूर्व फेरी गाठली. तसेच माजी राष्ट्रकुल सुवर्णपदक विजेत्या पारूपल्ली कश्यपलाही आगेकूच करण्यात यश आले.

१९ वर्षीय तनीषाने इशान भटनागरच्या साथीने खेळताना मिश्र दुहेरी गटाच्या उपउपांत्यपूर्व फेरीत चायनिज तैपेईच्या चेंग काय वेन आणि वांग यु क्विओ जोडीवर २१-१४, २१-१७ अशी सरशी साधली. मग महिला दुहेरीत तनीषाने श्रुती मिश्राच्या साथीने तैपेईच्याच जिया यिन लिन आणि लिन यु-हाओ जोडीचा २१-१४, २१-८ असा पराभव केला. दुसरीकडे, अनुभवी कश्यपने पुरुष एकेरीच्या सामन्यात तैपेईच्या चिआ हाओ ली याच्यावर २१-१०, २१-१९ अशी मात केली.

# आशिया चषकासाठी प्रसारकांची जोरदार तयारी

## स्टार स्पोर्ट्सने तयार केले थीम साँग

।नवी दिल्ली। महाईन्यूज ।



आयसीसी टी २० विश्वचषक अवघ्या काही महिन्यांवरती येऊन ठेपला आहे. त्यापूर्वी आशिया खंडातील क्रिकेट संघांना आपापली क्षमता पडताळून बघण्याची संधी मिळणार आहे. विश्वचषकापूर्वी आशिया चषक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. येत्या २७ ऑगस्टपासून युनायटेड अरब अमिरातीमध्ये (यूएई) आशिया चषक खेळवला जाणार आहे. त्यासाठी भारतीय संघासोबतच प्रसारकांनी देखील जोरदार तयारी सुरू केली आहे.

आशिया चषकासाठी स्टार स्पोर्ट्स नेटकवर्क आणि हॉटस्टार सामन्यांचे प्रसारण करणार आहे. त्यासाठी स्टार स्पोर्ट्सने थीम साँग तयार केले आहे. त्याचा व्हिडीओ स्टारने शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये भारतासह इतर सर्व संघांना स्थान देण्यात आले आहे. "नंबर वन मेरा इंडिया अब जीतेगा एशिया, पडोसियों में भी जागी है जीत की उमंग", असे या गाण्याचे बोल आहेत. क्रिकेट चाहत्यांना हे जोशपूर्ण गाणे आवडल्याचे दिसत आहे. व्हिडीओ शेअर झाल्यानंतर काही वेळातच त्यावर लाईक्सचा पाऊस पडला आहे. ही स्पर्धा श्रीलंका येथे खेळवली जाणार होती. मात्र, मागील काही महिन्यांपासून तिथे राजकीय तसेच आर्थिक संकट ओढावले आहे. परिणामी येथील नागरिक प्रचंड संतापलेले आहेत. त्यामुळे आशिया चषक क्रिकेट स्पर्धा श्रीलंकेत खेळवणे योग्य होणार नाही, असा बीसीसीआयचा विचार आहे. याच कारणामुळे ही स्पर्धा आता श्रीलंका ऐवजी यूएई येथे खेळवली जाणार आहे.

अलीकडच्या काळाचा विचार केला तर भारतीय संघाने २०१६ आणि २०१८ मध्ये आशिया चषक जिंकलेला आहे. यावर्षीचा आशिया चषक भारतासाठी अधिक महत्वाचा असणार आहे. भारताचा तारांकित फलंदाज विराट कोहलीला देखील आशिया स्पर्धेत फॉर्ममध्ये परतण्याची संधी आहे. या स्पर्धेत खेळाडूंची कामगिरी बघून टी २० विश्वचषकासाठी भारतीय संघाची निवड होण्याची दाट शक्यता आहे.

### भारत-वेस्ट इंडिज एकदिवसीय मालिका :

# युवकांसाठी सुवर्णसंधी!

### आज विंडीजविरुद्ध भारतीय संघाचे विजयी सलामीचे लक्ष्य

।नवी दिल्ली महाईन्यूज ।



वेस्ट इंडिजविरुद्ध शुक्रवारपासून सुरू होणाऱ्या एकदिवसीय मालिकेत प्रमुख खेळाडूंच्या अनुपस्थितीत भारताच्या युवा खेळाडूंना आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वत:ला सिद्ध करण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे. शिखर धवनच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाचे हा सामना जिंकून मालिकेत विजयी सलामी नोंदवण्याचे लक्ष्य असेल.

गेल्या काही दिवसांपासून आंतरराष्ट्रीय क्रिकेटचे व्यग्र वेळापत्रक आणि विशेषत: एकदिवसीय क्रिकेटचे भवितव्य, याबाबत बरीच चर्चा केली जात आहे. इंग्लंडचा तारांकित अष्टपैलू बेन स्टोक्सने सततच्या क्रिकेटमुळे शरीरावर पडणाऱ्या ताणाच्या कारणास्तव एकदिवसीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली. तसेच अन्य काही माजी क्रिकेटपटूंनीही कसोटी आणि ट्वेन्टी-२० क्रिकेटच्या तुलनेत एकदिवसीय क्रिकेट मागे पडल्याचे म्हटले आहे. मात्र, भारताच्या युवा क्रिकेटपटूंसाठी विंडीजविरुद्धची ही एकदिवसीय मालिका महत्त्वपूर्ण ठरू शकेल. कर्णधार रोहित शर्मासह विराट कोहली, जसप्रीत बुमरा, मोहम्मद शमी, ऋषभ पंत आणि हार्दिक पंड्या यांसारख्या प्रमुख भारतीय खेळाडूंना एकदिवसीय मालिकेसाठी विश्रांती देण्यात आली आहे.

त्यांच्या अनुपस्थितीत युवा खेळाडूंना सर्वांचे लक्ष वेधून घेण्याची संधी मिळेल. इंग्लंडविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेतील निराशाजनक कामगिरीनंतर कर्णधार शिखर धवन विंडीजविरुद्ध मोठी खेळी करण्यासाठी उत्सुक असेल. त्याच्या साथीने सलामीसाठी भारताकडे ऋतुराज गायकवाड, शुभमन गिल आणि इशान किशन यांचे पर्याय उपलब्ध आहेत. किशन यष्टीरक्षणाची धुरा सांभाळेल.


महाईन्यूज

जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क

708 309 8763

महाईन्यूज नोंद असू द्या..

महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही